
# Press and News Section



## ‘मविप्र डी. फार्मसी’चा १००% निकाल

**नाशिक :** मविप्र संस्था संचलित आडगाव येथील इन्स्टिट्यूट फार्मास्युटिकल सायन्सेस महाविद्यालयाचा द्वितीय डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी अंतिम परीक्षेत उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. महाविद्यालयातील ऋषिकेश वाघ व अश्विनी शेलार या दोन्ही विद्यार्थ्यांनी ९९.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर आशिष शेलारने ९९ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. श्वेता जगतापने ९८.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार, अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, सभापती माणिक बोरस्ते, उपसभापती राघोनाना अहिरे, चिटणीस डॉ. सुनील ढिकले, शिक्षणाधिकारी डॉ. एन. एस. पाटील, प्राचार्य डॉ. नितीन हिरे आदींनी कौतुक केले.

# मविप्र डी.फार्मसीचा शंभर टक्के निकाल



**नाशिक : प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संचलित आडगाव येथील इन्स्टिट्यूट फार्मसुटीकल सायन्सेस, आडगांव महाविद्यालयाचा द्वितीय डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली . महाविद्यालयाचा निकाल दरवर्षी प्रमाणे यंदा ही शंभर टक्के लागला आहे.

महाविद्यालयांतील ऋषिकेश वाघ व अश्विनी शेलार या दोन्ही विद्यार्थ्यांनी ९९.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तसेच आशिष शेलार या विद्यार्थ्याने ९९ % गुण मिळवून द्वितीय, श्वेता जगतापने ९८.८०%गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. यशाबद्दल संस्थेच्या सरचिटणीस निलीमा पवार ,अध्यक्ष डॉ तुषार शेवाळे,सभापती माणिक बोरस्ते, उपसभापती राघो नाना अहिरे, चिटणीस डॉ सुनील ढिकले ,संचालक मंडळ , शिक्षणाधिकारी डॉ एन एस पाटील, प्राचार्य डॉ नितीन हिरे यांनी अभिनंदन केले आहे.

# मविप्र फार्मसीचा शंभर टक्के निकाल



हृषीकेश वाघ



अश्विनी शेलार

नाशिक : मराठा विद्याप्रसारक समाज संचालित आडगाव येथील इन्स्टिट्यूट फार्मसिटीकल सायन्सेस या महाविद्यालयाचा द्वितीय डी. फार्मसी महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. महाविद्यालयांतील हृषीकेश वाघ व अश्विनी शेलार या दोन्ही विद्यार्थ्यांनी ९९.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. आशिष शेलार या विद्यार्थ्याने ९९ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, श्वेता जगताप हिने ९८.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती नीलिमाताई पवार, अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, सभापती माणिकराव बोरस्ते, प्राचार्य डॉ. नितीन हिरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

आपलं महानगर

# मविप्र आडगाव फार्मसी महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के

नाशिक ● मराठा विद्या प्रसारक समाज संचलित इन्स्टिट्यूट फार्मसुटीकल सायन्सेस, आडगाव या महाविद्यालयाचा द्वितीय डी. फार्मसीचा निकाल शंभर टक्के लागला. महाविद्यालयांतील ऋषिकेश वाघ व अश्विनी शेलार या दोन्ही विद्यार्थ्यांनी ९९.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच आशिष शेलार या विद्यार्थ्याने ९९ टक्के गुण मिळवून द्वितीय, श्वेता जगताप हिने ९८.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.



lokmat Times

# Exemplary result of Pharmacy students at MVPS Institute



Results of the first-year pharmacy course were recently announced by the Maharashtra State Board of Technical Education. The students MVPS Institute of Pharmaceutical Sciences, Adgaon Nashik performed very well and they managed to achieve 95.16 percent result. Kunal Kshatriyasecured the first position with 94.82 percent, Pathan Nusrat secured the second position with 93.64 percent marks and Prachi Mate and Udayraj Patil secured the third position with 93.25 percent.

In all 18 students of the college passed with distinction and 26 students passed with first class, informed principal Nitin Hire. The college has always focused on personality development along with the academic quality of the students. The organisation is reaching the pinnacle of success by working successfully at ground level and guiding students for their future. The students were very happy after getting good marks. The parents have also appreciated the efforts put by the teachers and students to get such a good result. MVP general secretary Nilimatai Pawar, president Dr Tushar Shewale, local management committee members Manikrao Boraste, director Sachin Pingale, education officer Dr NS Patil, Dr Sunil Dhikale, Ragho Nana Ahire, and others and others congratulated the students for their achievement.

Nashik First
Page No. 2 Jul 25, 2020
Powered by: erelego.com

smart Nashik पुण्यनगरी

चे दुर्भिक्ष जाणवतेय... ग्रामीण भागातील दुष्काळाचे चित्र फारच भयावह आहे...
लाम! तर चला वसुंधरेला वाचविण्यासाठी एक पाऊल उचलू या.



■ एमव्हीपी इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटिकल

पांडुरंग अकोलकर, नवीन ताबंद,



# फार्मसी महाविद्यालयात विद्यार्थी मेळावा

नाशिक : मविप्र समाज संचलित डी.फार्मसी आडगाव महाविद्यालयात विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात व्यावसायिक, शैक्षणिक क्षेत्रातील तसेच औषधनिर्माण कंपनीतील माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार, माजी प्राचार्य डॉ. अशोक पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. एन. एस. पाटील, माजी प्राध्यापिका डॉ. सुवर्णा कट्टी, श्रीमती अनुपमा कापडणीस, श्रीमती स्वाती लांडगे, प्राचार्य डॉ. नितीन हिरे उपस्थित होते. माजी प्राचार्य डॉ. अशोक पिंगळे यांनी औषधनिर्माण क्षेत्रातील विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. नितीन हिरे यांनी विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. प्रा. अमोल देवरे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. जयप्रभा सलादे यांनी आभार मानले.

# डी. फार्मसी कॉलेजला माजी विद्यार्थी मेळावा

**सध्या औषधनिर्माण कंपनीत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सहभाग**




**प्रतिनिधी । नाशिक**

मविप्र समाज संचलित डी. फार्मसी आडगाव महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात व्यावसायिक, शैक्षणिक क्षेत्रातील तसेच औषधनिर्माण कंपनीतील माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार, माजी प्राचार्य डॉ. अशोक पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. एन. एस. पाटील, माजी प्राध्यापिका डॉ. सुवर्णा कट्टी, अनुपमा कापडणीस, स्वाती लांडगे, प्राचार्य डॉ. नितीन हिरे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना पवार यांनी सांगितले की, औषधनिर्माण क्षेत्रातील व्यावसायिक दृष्टिकोन जोपासून विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले. माजी प्राचार्य डॉ. अशोक पिंगळे यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंत झालेल्या वाटचालीबद्दल माहिती दिली तसेच औषधनिर्माण क्षेत्रातील विविध संधीबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. नितीन हिरे यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. प्रा. अमोल देवरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयप्रभा सलादे यांनी आभार मानले.

होईल.

## 'मविप्र' डी.फार्मसी.मध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

नाशिक : 'मविप्र'च्या आडगाव येथील डी. फार्मसी. महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा झाला. मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती नीलिमाताई पवार, माजी प्राचार्य डॉ. अशोक पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. एन. एस. पाटील, डॉ. सुवर्णा कट्टी, अनुपमा कापडणीस, स्वाती लांडगे, प्राचार्य डॉ. नितीन हिरे उपस्थित होते. व्यावसायिक दृष्टिकोन जोपासून विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत श्रीमती पवार यांनी व्यक्त केले.

Fravashi organised a Fancy Dress competition

their confidence and round off their personality. The children displayed innova-

for the competition were Mangeshi Kajale and Shivali Jaiswal. They felic-

the children. The day was enjoyed by all.

# MVP Pharma signs MOU with Boroton

A Memorandum of Understanding was signed between the MVP Institute of Pharmaceutical Sciences, Adgaon Nashik and Boroton Research Center for providing research and employment oriented guidance to the students of the college.

Yogesh Bhadane, Chief Executive Officer of Boroton Research Center and principal Dr Nitin Hiray signed the MOU. This agreement will give employment to the students while they are out of college or after training. Staff and students of the college were present on the occasion. Such a joint venture will open up new opportunities for the students of the college.



# मविप्रच्या फार्मसी महाविद्यालयात समाजदिन

। नाशिक । वार्ताहर ।

मविप्र संचलित इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस,आडगाव महाविद्यालयात कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा स्मृतीदिन समाजदिन म्हणून महाविद्यालयाच्या आवारात उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रा.देवयानी फरांदे उपस्थित होत्या. त्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन हिरे यांनी केला. यावेळी आ.फरांदे यांनी व्यक्तिमत्व विकास व फार्मसी क्षेत्रातील संधी या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन कमिटीचे सदस्य रमेश चव्हाण, अरुण भोर, योगेश कदम, रवींद्र भामरे तसेच प्राचार्य डॉ.नितिन हिरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन महाविद्यालयातील विद्यार्थी प्रतिक सजगुरे व आरती शेळके यांनी केले तर कांचन लोलगे या विद्यार्थिनीने आभार मानले.



व गुणात्मक प्रगतीचा आलेख स्पष्ट युगात यशाचा आलेख असाच उंच कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# मविप्र डी. फार्मसीचा चिंतन राज्यात प्रथम

**प्रतिनिधी | नाशिक**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या फार्मसी पदविका परीक्षेत मविप्रच्या आडगाव कॉलेजचा प्रथम



वर्षाचा विद्यार्थी चिंतन जयेश भिंडे ९२.१८ टक्के गुण मिळवून राज्यात फार्मसी पदविकेत प्रथम आला आहे. तर, कांचन लोळगे ८८.८२ टक्के गुणांसह द्वितीय, योगिता टर्ले ८३.०९ टक्के गुणांसह तृतीय आले आहेत.

द्वितीय वर्ष डी. फार्मसीमध्ये पीयूष बोरस्ते ८३.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तर सचिन वालझाडे ८२.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, रोशन गिते याने ८१.४० टक्के गुण मिळवले. या यशाबद्दल संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार, प्राचार्य डॉ. नितीन हिरे, पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, शिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



तंत्रनिकेतनमध्ये राज्यात, तसेच महाविद्यालयात प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह मातोश्री आसराबाई पॉलिटेक्निकचे प्राचार्य संजय बागुल व सर्व विभागांचे प्रमुख.

# मातोश्री कॉलेजचा विद्यार्थी राज्यात प्रथम

## अक्षय हांडगेला अप्लाइड सायन्समध्ये १०० गुण

**प्रतिनिधी | नाशिक**

मातोश्री शिक्षण संस्थेच्या तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या अक्षय हांडगे हा विद्यार्थी अप्लाइड सायन्स विषयात १०० गुण मिळवून महाराष्ट्रात प्रथम आला आहे. त्याला ९२.१० टक्के गुण मिळाले आहेत.

तृतीय वर्षाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचा निकाल १०० टक्के लागला असून, कावेरी मोरे ही विद्यार्थिनी ८२.५९ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे, तर द्वितीय वर्षाच्या सुरेखा शिंदे ही ८५.६७ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. स्नेहल खर्डे ही विद्यार्थिनी ८८.३३ टक्के गुण मिळवून संगणक अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात प्रथम आली आहे. तृतीय वर्ष संगणक विभागातील वैभवी भोसले ही ८३.७५ टक्के गुणांसह प्रथम आली. तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकीचा निकाल ९६.१५ टक्के लागला आहे.

...स्वरूप, मुला-मुलींसाठी मैदानी चाचणीचा सराव, प्रशिक्षणात निवड आणि यशस्वी होण्यासाठी आहाराचे नियोजन आदी विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

## पेपर व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत चेतन भिडेचा प्रथम क्रमांक



**नाशिक** | महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ व महावीर फार्मसीतर्फे आयोजित जिल्हास्तरीय पेपर व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत 'स्वयंऔषधोपचार व त्यामुळे होणारे दुष्परिणाम' व 'फार्मासिस्टची आधुनिक काळातील भूमिका' या विषयांवर पोस्टर प्रेझेंटेशन विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यात आडगाव कॉलेज ऑफ फार्मसीच्या चेतन भिडे याने प्रथम क्रमांक, तर द्वितीय क्रमांक सुजित देशमुख या विद्यार्थ्याने मिळविला. पेपर प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक शुभांगी खोडे हिने मिळविला.

| नाशिक |



महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने राज्यभरात घेतलेल्या उन्हाळी परीक्षा २०१६ फार्मसी पदविका परीक्षेत मविप्र डी फार्मसीच्या प्रथम वर्षाचा विद्यार्थी कु. चितन जयेश भिडे याने ९२.१८ टक्के गुण मिळवून राज्यात प्रथम आला. कांचन लोळगेने ८८.८२ टक्के मिळवून द्वितीय क्रमांकाने व योगिता टर्ले ८३.०९ टक्के ही तृतीय क्रमांक पटकाविला. द्वितीय वर्ष डी फार्मसीमध्ये पीयुष बोरस्ते ८३.५० टक्के मिळवून प्रथम सचिन वालझाडे ८२.६० टक्के मिळवून द्वितीय रोशन गिते ८१.४० टक्के मिळवून तृतीय आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सरचिटणीस नीलिमाताई पवार, प्राचार्य डॉ. नितीन हिरे आदींनी अभिनंदन केले.

# मेट-भुजबळ नॉलेज सिटी, 'मविप्र' महाविद्यालय विजेते

## औषधनिर्माता सप्ताहातील स्पर्धांचे पारितोषिक वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ३० : इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशनची नाशिक शाखा व जिल्ह्यातील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांच्यातर्फे ५६ व्या राष्ट्रीय औषधनिर्माता सप्ताहानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन मंगळवारी (ता. ३०) गौरव करण्यात आला. पदवी महाविद्यालयांच्या गटातून मेट-भुजबळ नॉलेज सिटीचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, तर पदविका महाविद्यालयांच्या गटातून 'मविप्र' संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स या महाविद्यालयांनी सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

सप्ताहानिमित्त झालेल्या विविध ३५ स्पर्धांत सुमारे सहा हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी दोन हजार विद्यार्थ्यांना विविध गटांतून पारितोषिके देण्यात आली. भाभानगर येथील दादासाहेब गायकवाड सभागृहात झालेल्या पारितोषिक वितरण समारंभाला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या औरंगाबाद विभागाचे उपसंचालक डॉ. आनंद पवार यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण झाले.

या वेळी असोसिएशनच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र भांबर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप डेर्ले, सचिव डॉ. एम. पी. वाघ, खजिनदार डॉ. एस. व्ही. अमृतकर, सहसचिव डॉ. वाय. व्ही. उशीर, माजी अध्यक्ष आर. बी. मुंदडा, सदस्य पी. जी. मोराणकर, डी. के. पाटील उपस्थित होते.

### असे आहेत विजेते...

**पदवी गटातून मेट-भुजबळ नॉलेज सिटीच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. या गटातून उपविजेतेपद दोन महाविद्यालयांना विभागून देण्यात आले. 'मविप्र'चे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व कळवण येथील जे. पी. पवार औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय यांना उपविजेतेपद विभागून दिले. पदविका गटातून 'मविप्र' संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स यांनी विजेतेपद पटकावले. एशियन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी उपविजेते ठरले. या महाविद्यालयांना आकर्षक करंडक देऊन गौरविले.**